# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०८/०७/२०२४ (सोमवार) सायंकाळ**

---

## पोस्टे खापरखेडा हद्दीमधील सट्टापट्टी लिहणारे आरोपींविरूद्ध कारवाई

दिनांक ०८/०७/२०२४ रोजी पोस्टे खापरखेडा येथील स्टाफ पोस्टे हद्दीत अवैध धंदयावर रेड संबंधाने पेट्रोलींग करीत असताना पोस्टे खापरखेडा अंतर्गत नांदा शिवार किल्ले कोलार नदी जवळ काही इसम हे लोकांकडुन पैसे घेवुन सट्टा पट्टीचे आकडे लिहुन लोकांना पैश्याचा हारजितचा जुगाराचा खेळ खेळवित आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहिती वरून स्टाफने नांदा शिवार किल्ले कोलार नदी जवळ छापा टाकुन यातील आरोपी नामे— १) मोहम्मद सलीम शेख वय ४५ वर्ष, रा. वार्ड क्र. २ दत्तनगर मिलन चौक खापरखेडा २) रानु उर्फ समसुद्दीन अलीमुदीन सिद्धकी, रा. चनकापूर हे नांदा शिवारातील किल्ले कोल्हार नदीच्या पात्रा जवळ लोकांकडुन पैसे घेवुन सट्टा पट्टीचे आकडे लिहुन लोकांना पैश्याचा हारजितचा जुगाराचा खेळ खेळवितांना मिळुन आल्याने सदर आरोपींना ताब्यात घेवुन त्याची अंगझडती घेतली असता त्याचे ताब्यातुन सट्टापट्टी साहीत्य व नगदी २४१०/—रू. व सट्टापट्टी साहित्य मिळुन आल्याने आरोपी विरुध्द कलम १२ (अ) म.जु.का सह कलम ४९ भा. न्या. स अन्वये गुन्हा नोंद करुन तपासात घेण्यात आला.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे खापरखेडा येथील ठाणेदार श्री. धनाजी जळक, पोहवा मुकेश वाघाडे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर